RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२७)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXIV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

सन १८८८ चा मुंबई ३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यात आणखी चा मुंबई सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (तीसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६१ ची सुधारणा.

**२.** सन १८८८ चा २ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ याच्या कलम ६१ मधील पोट-कलम 'ट' नंतर पुढील मुंबई अधिनियम पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(य) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अंतर्गत तरतुदींचा अवलंब करून मुंबईच्या विकास आराखड्यात विवक्षित केलेल्या कोणत्याही बाबींकरिता आरक्षण, वाटप आणि संकल्पचित्र यांच्याशी संबंधित तरतुदीची अंमलबजावणी करणे."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबईसारख्या महानगरामध्ये विविध नागरी सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य असून मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ६१ अंतर्गत महानगरपालिकेच्या आद्य कर्तव्यांच्या बाबी नमूद केल्या आहेत. सदर बाबींमध्ये नमूद केलेल्या सेवा पुरविणे महानगरपालिकेस बंधनकारक असून त्यासाठी विशिष्ट कार्यपद्धती निश्चित केली जाते. उक्त अधिनियमात कालपरत्वे सुधारणा करण्यात आल्या, त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ६१ अंतर्गत आद्य कर्तव्यांच्या बाबतही आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे.

मुंबईसारख्या मोठ्या महानगराच्या विकासाच्या दृष्टीने महानगराचा विकास आराखडा अत्यंत महत्त्वाचा असतो. या आराखड्याचा मसुदा नागरिकांकडून हरकती व सूचना मागवून घेऊन व त्यावर सांगोपांग विचार करून तयार होतो. तथापि, असा अनुभव आहे की आराखड्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम तंतोतंत होत नाही. त्याचे प्रमुख कारण असे आहे की, महानगरपालिकेकडे विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष नाही व त्याअभावी कालबद्ध कृती योजना अस्तित्वात येत नाही. नागरिकांच्या गरजांचा तपशीलवार अभ्यास करून तयार झालेल्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणारी किंवा नियमितपणे आढावा घेणारी यंत्रणा महानगरपालिकेकडे अस्तित्वात नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या कामकाजातील काही विशिष्ट कामांबावत कार्यपद्धती तयार करताना कामाची संबंधित बाब मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६१ अंतर्गत येत असल्यास त्या कामास अधिक गंभीरतेने घेतले जाते हा अनुभव आहे. अतः त्याच धर्तीवर मुंबईच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचे कामही प्रशासनाने प्राधान्याने व गांभीर्यपूर्वक घेऊन त्याची अंमलबजावणी होण्यासाठी सदर बाब 'आद्य कर्तव्य' म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ६१ अंतर्गत बाबींमध्ये समाविष्ट करणे आवश्यक झाले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :** **अतुल भातखळकर,**
मुंबई, प्रभारी सदस्य.
दिनांक २३ जून,२०२५.

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे,**
मुंबई, सचिव-१,
दिनांक ४ जुलै, २०२५. महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.